# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 22/12/2021 (बुधवार)

---

## चोरी

1) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 18 कि. मी. अंतरावरील चारभा मौदा येथे दिनांक 20/12/2021 चे 08.00 वा. दरम्यान धानाचे 40 पोते शेत शिवार चारभा येथे ठेवले होते. दि 21.12.21 चे सकाळी 08.00 वा जावुन फिर्यादी नामे– जितेंद्र मुलचंद कोकोडे वय 35 वर्ष रा. वार्ड नंबर 02 पिपरी ता. मौदा जि नागपुर यांनी जाउन पाहनी केली असता त्यांना शेताता ठेवलेले 40 पोते धान किंमत 90,000/–रू. चा माल दिसुन आला नाही. अज्ञात आरोपीने फिर्यादीचे शेतातील 40 पोते धान किंमत 90,000/–रू. चा माल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा देशमुख मो न 9922447045 हे करीत आहे.

2) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 13 कि.मी. अंतरावरील पोलिस चौकी समोर पाटणसावंगी येथे दिनांक 21/12/2021 चे 13.45 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. उषा शंकर अडागळे वय 50 वर्ष रा.वार्ड क्र. 4 गोंडेगाव हि एमपी– 28/पी–0747 क्रमांकाच्या ट्रॅव्हल्स बस मध्ये बसुन छिंदवाडा येथे आपल्या नातेवाईकांकडे जात होत्या. त्यादरम्यान आरोपी क्र. 1) सौ. फुलाबाई चरणदास उफाडे वय 40 वर्ष, 2) सौ. सोनाली उदयभान उफाडे वय 30 वर्ष व 3) सौ.सोनी दिनेश मानकर वय 35 वर्ष, सर्व रा. शताब्दी नगर, झोपडपट्टी रामेश्वरी नागपूर यांनी संगनमत करून फिर्यादीचे बॅगची चैन उघडून बॅग मध्ये ठेवलेले नगदी 2,000/–रू. चोरण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 379, 511, 34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार संदीप नागरे हे करीत आहे.

3) पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत 4 कि.मी. अंतरावरील मांडवा शिवार येथे दिनांक 11/12/2021 चे 12.00 वा. दरम्यान आरोपी कंटेनर क्र. एचओ– 46/एफ– 0557 चा चालकाने कंटेनर मध्ये मारोती कंपनीचे स्पेअर पार्ट घेवुन गेला व कंटेनर गाडी चे स्टेपनी सहीत 7 नविन टायर कि. 95,000/–रू. चोरून जुने बदलुन कंटेनर पार्कींग मध्ये आत आणुन ठेवनु पळुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सुभाष रामकुमार चंद्र, वय 32 वर्ष, रा. मायटावुन गोंडवाना ता. हिंगणा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 381 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार इकबाल शेख हे करीत आहे.

## जबर दुखापत

1) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत वार्ड क्र. 4 खापरखेडा येथे दिनांक 20/12/2021 चे 09.15 वा. दरम्यान फिर्यादीं नामे– संघपाल वासुदेव लोखंडे वय 42 वर्ष रा वार्ड क्र 04 खापरखेडा याने आरोपी क्र. 1) यशपाल देशभ्रतार, वय 35 वर्ष, रा. वार्ड क्र 04 खापरखेडा याचे घराचे रिपेरींगचा ठेका घेतला होता. त्याचे पुर्ण काम करून त्या कामाचे पैसे सुध्दा फिर्यादीला मिळाले होते. यातील आरोपी क्र 01 व 02) सँडी रेवतकर वय 28 वर्ष रा वार्ड क्र 04 खापरखेडा यांनी फिर्यादीचे घरी येवुन त्यास म्हटले की, 'तु घराचे काम बारोबर केले नाही व पैसे पुर्ण घेवुन गेला' या कारणावरून फिर्यादी व आरोपी यांच्यात वादविवाद होवुन शिवीगाळ केली तसेच हातबुक्कीने व लाकडी दांडयाने उजव्या कांधावर व कमरेवर मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 325, 504 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार जानुसिंग जाधव मो नं 9923104310 हे करीत आहे.

2) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत मौजा दिघोरी येथे दिनांक 20/12/21 चे 17.30 वा. ते 18.40 वा. दरम्यान आरोपी क्र. 1) राजेश श्रावण जाधव, 2) श्रावण जाधव, 3) संजय श्रावण जाधव व 4) बत्तोबाई श्रावण जाधव सर्व रा. दिघोरी ता. उमरेड हे फिर्यादी नामे– सौ. लक्ष्मीबाई टिकु जाधव, वय 60 वर्ष, रा. दिघोरी ता. उमरेड यांचे घरात घुसुन 'तुमचा कुत्रा आमच्या घरी आला व आमच्या बकऱ्या पळाल्या व माझ्या अंगावर आला'' असे म्हणुन फिर्यादीचे मुला सोबत भांडण करून फिर्यादीस व फिर्यादीच्या मुलास मारहाण करीत असता फिर्यादी ही भांडण सोडविण्यास गेली असता आरोपी क्र 1 याने फिर्यादीला शिवीगाळ करून मारहाण केली व परिवाराला पाहुन घेण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 452, 325, 504 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार ईश्वर जोधे मो.क्र. 9823115372 हे करीत आहे.

## फसवणुक

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 05 कि मी अंतरावरील स्टेट बॅक ऑफ इंडिया मौदा येथे दिनांक 21/12/2020 चे 15.15 वा. ते 15.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. यशोदा प्रल्हादजी तिघरे वय 40 वर्ष, रा. केसलापूर ता. मौदा ही दि. 21/12/2021 रोजी दुपारी 01.00 दरम्यान स्टेट बॅक ऑफ इंडिया मौदा येथे पैसे काढण्याकरीता गेल्या होत्या. त्यादरम्यान बॅकेतून 50,000/–रु. काढून फिर्यादीने आपले पती यांना दिले. फिर्यादीचे पती पैसे मांडीवर घेवून मोजित असतांना एक अज्ञात आरोपी फिर्यादी जवळ येवून 'तुमच्या पैसाच्या बंडल मध्ये एक नोट जुनी आहे,'' असे म्हटले त्यावर फिर्यादीने त्याला बंडल मोजन्या करीता दिली असता ते नोट व पैश्याचा बंडल मधून 500/–रु. ची नोट डुपलीकेट आहे असे म्हणून काढली व पुन्हा फिर्यादीच्या पतीने पैसे मोजले असता त्या पैसा मध्ये 500/–रु. चे 64 नोटा एकुण 32,000/–रु. होते व त्यामध्ये 18,000/–रु. आरोपीने हात चालाखीने काडून फसवणुक करुन तेथून निघून गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 420 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा गौतम मेश्राम मोक्र 9822545169 हे करीत आहे.

# अकस्मात मृत्यू

पो.स्टे. अरोली :– अंतर्गत 11 कि.मी. अंतरावरील मौजा बारसी येथे दिनांक 14/12/2021 चे 17.15 वा. पुर्वी अक्षय हिरामण वाहणे वय 23 वर्ष रा.बारसी याने अज्ञात कारणातुन त्याचे राहते घरी किटकनाशक औषध प्राशन केले. त्यास उपचाराकामी मेयो हॉस्पीटल येथे भरती केले उपचारा दरम्यान दि. 20/12/21 रोजी मरण पावला. मेयो हॉस्पीटल येथुन मृतक चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार नझीर कुरेशी मेयो पोलिस बुथ यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. अरोली येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक उमेश इंगळे मो.नं. 9923463461 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर